**प्रेस नोट** **दि.०९/०३/२०१९**

## खडकी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## वयोवृध्द महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेवुन त्यांचे ताब्यात दिले

दि.०९/०३/२०१९ रोजी दुपारी ०३/३० वा. चे सुमारास एक ७५ वर्षाची वयोवृध्द महिला खडकी पोलीस ठाणे समोरील चर्च चौक, खडकी पुणे येथे गरबडलेल्या अवस्थेत म. पोलीस शिपाई ५२९६ पवार व पो. शि. ८१०८ नानापुरे खडकी पोलीस ठाणे पुणे शहर यांना मिळुन आली. सदर महिलेची अवस्था पाहुन म. पोलीस शिपाई ५२९६ पवार यांनी त्यांचे जवळ जावुन त्यांची विचारपुस केली असता सदर महिला त्यांचे राहते घराचा पत्ता मिळुन येत नसुन भरकटलेल्या अवस्थेत चर्च चौकात आल्याचे समजले. त्यांचा राहणेचा पत्ता त्यांना विचारला असता त्या केवळ गांधी किराणा दुकान येवढाच पत्ता सांगत होत्या.

सदर महिलेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी ॲडवर नावाचा म्युझीक टिचर हा त्यांचा जावाई असुन त्यांचे मुलीचे नाव रोजी असे असल्याचे सांगितले. सदर नावांवरुन तसेच गांधी किराणा दुकान यावरुन पो. शि. नानापुरे यांनी खडकी बाजार व बोपोडी परिसरात चौकशी केली असता चौकशी दरम्यान सदर वयोवृध्द महिला ब्राम्हनगिरी सोसायटी, भाऊ पाटील रोड, आय.टी. पार्क समोर, पुणे याठिकाणी राहणेस असल्याची माहिती मिळाली. त्यावर म. पोलीस शिपाई ५२९६ पवार व पो.शि. नानापुरे हे सदर पत्त्यावर जावुन त्याबाबत खात्री केली असता नमुद पत्त्यावर सदर वयोवृध्द महिलेचे नातेवाईक नामे मेझील नॉसी फ्रॉन्सीस हे मिळुन आले. त्यांना आम्ही नमुद महिलेचा फोटो दाखवुन त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी सदर महिलेस ओळखुन त्या त्यांचे नातेवाईक असल्याचे सांगीतले. सदर वयोवृध्द महिलेस इसम नामे मेझील नॉसी फ्रॉन्सीस यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

**(भागवत मिसाळ)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.